PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Amar bhoopali
Year: 1951

Song: Latapat latpat tujhe chalane
Lyricist: Shahir Honaji Bala

लटपट लटपट लटपट लटपट
तुझं चालणं गं मोठ्या नखऱ्याचं
चालणं गं मोठ्या नखऱ्याचं
बोलणं गं मंजुळ मैनेचं
बोलणं गं मंजुळ मैनेचं
नारी गं नारी गं
नारी गं ह ...
नारी गं ह ...
नारी गं
लटपट लटपट लटपट लटपट
तुझं चालणं

कांती नव नवतीची
कांती नव नवतीची
दिसे चंद्राची प्रभा ढवळी
जाईची रे वेल कवळी
जाईची रे वेल कवळी
दिसे नार सुकुमार
नरम गाल व्हट पवळी
दिसे नार सुकुमार
नरम गाल व्हट पवळी
जशी चवळीची शेंग कवळी
जशी चवळीची शेंग कवळी
दिसे नार सुकुमार
नरम गाल व्हट पवळी
तारूणपण अंगात
झोक मदनाचं जोरात
चालणं गं मोठ्या नखऱ्याचं
बोलणं गं मंजुळ मैनेचं
बोलणं गं मंजुळ मैनेचं
नारी गं नारी गं
नारी गं ह ...
नारी गं ह ...
नारी गं
लटपट लटपट लटपट लटपट
तुझं चालणं

रूप सुरतीचा डौल
रूप सुरतीचा डौल
तेज अनमोल सगुण गहिना
जशी का पिंजऱ्यातील मैना
जशी का पिंजऱ्यातील मैना
हिच्यासाठी कितीकांची
जनलोकांत झाली दैना
हिच्यासाठी कितीकांची
जनलोकांत झाली दैना
अशी ही चंचल मृगनयना
अशी ही चंचल मृगनयना
हिच्यासाठी कितीकांची
जनलोकांत झाली दैना
लखलख लखलख
तेज गं जैसे तुटत्या ताऱ्याचं
लखलख लखलख
तेज गं जैसे तुटत्या ताऱ्याचं
चालणं गं मोठ्या नखऱ्याचं
बोलणं गं मंजुळ मैनेचं
बोलणं गं मंजुळ मैनेचं
नारी गं

नारी गं
नारी गं ह ...
नारी गं ह ...
नारी गं
लटपट लटपट लटपट लटपट
तुझं चालणं गं मोठ्या नखऱ्याचं

चालणं गं मोठ्या नखऱ्याचं
बोलणं गं मंजुळ मैनेचं
बोलणं गं मंजुळ मैनेचं
नारी गं
नारी गं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*